Punyanagri

# ९ वे 'ॲग्रोव्हिजन' कृषी प्रदर्शन १० नोव्हेंबरपासून

पुण्य नगरी प्रतिनिधी

नागपूर : मध्य भारतातील सर्वांत मोठे कृषी प्रदर्शन असलेले 'ॲग्रोव्हिजन' १० ते १३ नोव्हेंबरदरम्यान रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. हे ९ वे ॲग्रोव्हिजन प्रदर्शन आहे, अशी माहिती केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

या प्रसंगी गडकरी म्हणाले, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आघाडीच्या असलेल्या सुमारे ४००हून अधिक कृषीविषयक कंपन्या, संशोधन संस्था, उद्योजक, शेतकरी संशोधन, वित्तसंस्था, कृषी विद्यापीठे, शेती संबंधित शासकीय विभाग, सेवापुरवठादार आदींचा सहभाग हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण आहे.

## उपराष्ट्रपती नायडू यांच्या हस्ते उद्घाटन




ॲग्रोव्हिजन प्रदर्शनाचे उद्घाटन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर, राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित राहणार आहे. यावर्षी सुमारे २१ विषयांवर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळांमध्ये नवीन पिके, पाणी, व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशीपालन आदी शेतीपूरक व्यवसाय व विषयांचा समावेश आहे. याशिवाय 'बांबू लागवड व संधी' याविषयावर चर्चासत्रदेखील आयोजित करण्यात आले आहे. कृषी क्षेत्रातील नवीन प्रयोगांना सुमारे १ लाख रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनात्मक साहाय्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रपरिषदेला ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मोर्शीचे आ. अनिल बोंडे, गिरीश गांधी, माजी खा. दत्ता मेघे, रमेश मानकर, रवी बोरटकर आदी उपस्थित होते.

## १ 'ॲग्रोव्हिजन ॲप'चे लोकार्पण

शेतकऱ्यांना शेतीविषयक माहिती मिळावी, यासाठी 'ॲग्रोव्हिजन ॲप'चे लोकार्पण नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या ॲपमध्ये शेतकऱ्यांना कार्यशाळेत भाग घेण्यासाठी नाव नोंदविण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच, शेतकऱ्यांचे पीकपाण्यासंदर्भात काही प्रश्न असतील, तर त्याचीही माहिती या ॲपच्या माध्यमातून त्यांना मिळविता येणार आहे.

## २ दुग्ध उत्पादनावर भर

विदर्भात मोठ्या प्रमाणात दुग्ध उत्पादन होते. पण, ते वाढविण्याची गरज आहे. विदर्भात रोज सुमारे दोन लाख लिटर दुधाचे उत्पादन होते. परंतु, ज्या दिवशी ते उत्पादन २० लाख लिटरवर पोहोचेल त्या दिवशी विदर्भ खऱ्या अर्थाने संपन्न होईल, असे गडकरी म्हणाले. त्यामुळे या प्रदर्शनात दुग्ध उत्पादन आणि त्यावरील प्रक्रिया उद्योगांवर भर देण्यात येणार आहे.